FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0167744

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. १६, वर्ष Year 2020, दिनांक Date २५/१०/२०

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from जानेवारी 2019 ते १३/०६/2019, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to ........, वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १३/०६/२०१९ वेळ Time १३.३० वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २२/२०, तारीख Date २५/१०/२० वेळ Time १३=३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा दक्षिणेस 5 km., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. रमणिक कारिआ (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. हरघोर कारिआ
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ कार्ड नं. Card No. ........
   C/१६०३, अशोक टॉवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post करी रोड (पूर्व), मुंबई. P Stn.
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असलेल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्रीमती आरती चंदनशिवे, सब इंजीनियर, ई-वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, भायखळा, मुंबई.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

ज्यातील फिर्यादी श्री. रमणीक हरघोर कारिया; वय - ५७ वर्षे, धंदा - व्यापार, पत्ता - ८/१६०३, अशोक टॉवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, करी रोड (पूर्व), मुंबई - १२ यांचा स्वतंत्र कागदावर संगणकीकृत केलेला जबाब हाच सदर गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात आला आहे.

समक्ष

[signature]

(संजीव फुलपगारे)
पोलिस निरीक्षक
आ. प्र. वि., मुंबई.

[signature]

जबाब दिनांक १५/१०/२०२०

श्री रमणिक हरधोर कारीआ, वय ५७ वर्षे, धंदा – व्यापार, राठि – सी/१६०३, अशोक टॉवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, करी रोड (पु), मुंबई ४०० ०१२, मोबाईल नंबर ९३२०२०२१२१.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासोबत राहावयास आहे, माझा प्लास्टिक फाईल व फोल्डर बनविण्याचा कारखाना असून तो रूलर प्लास्टिक, युनिट नंबर २, चुनीलाल मेहता कंम्पाउंन्ड, हरीष अर्जुन पालव मार्ग, भायखळा, मुंबई ४०००२७ येथे आहे. मी सदरचा कारखाना गेल्या २० वर्षापासून चालवत असून कारखाना परवाना नुतनीकरण दर दहा वर्षांनी करीत आहे. सदर नुतनीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगर पालिका, ई वॉर्ड, भायखळा येथे करण्यात येते. माझे १ एप्रिल २०१९ पासून पुढील १० वर्षाकरीता परवाना नुतनीकरण करावयाचे होते. लोकसेविका श्रीमती आरती चंदनशिवे, सब इंजिनिअर, बृहन्मुंबई महानगर पालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांना परवाना नुतनीकरण करण्याचा अधिकार असल्याचे मला माहित असल्याने मी मॅनेजर श्री. समीर देसाई यांस त्यांचेकडे पाठविले होते. त्यावेळी लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी समीर देसाई याचेकडे रूपये १,५०,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली होती, परंतु मला लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक १३/०६/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार दिली होती.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मला दिनांक १४/०६/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात बोलाविण्यात आले आणि तेथील पोलीस निरीक्षक श्री. रेवणसिध्द ठेंगळे, सपोआ श्री. नितीन विजयकर यांनी करावयाच्या कारवाई संदर्भात कार्यप्रणालीची माहिती दिली व माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन शासकीय पंच व पोनि रेवणसिध्द ठेंगळे, सपोआ श्री. विजयकर व इतर पोलीस अंमलदार यांचे पथक तयार करण्यात आले व मला पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षते संदर्भात सुचना दिल्या. तसेच पडताळणी करीता जाते वेळी माझे शर्टच्या आतील बनियानला माझे व लोकसेविका श्रीमती आरती चंदनशिवे यांचेमधील संभाषण ध्वनीमुद्रीत करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर लावण्यात आला. त्यानंतर मी लोकसेविका श्रीमती आरती चंदनशिवे यांची बृहन्मुंबई महानगर पालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई येथील त्यांच्या कार्यालयात जावून भेट घेतली व माझे परवाना नुतनीकरणाच्या कामा संदर्भात विचारणा केली. यापुर्वी मी माझा मॅनेजर समीर देसाई यास त्यांच्याकडे पाठविले होते. म्हणून लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी मला **''तो काय नाय आला समीर ... तो तर बोलला होता ना .... येणार होता तुमच्या बरोबर .... बोला त्यांच्याशी, तो तर मला बोलला''** त्यावर मी त्यांना म्हणालो, **''काय म्हणजे... काम असेल तर बोलावून घेतो''** त्यावर लोकसेविका आरती चंदनशिवे मला म्हणाल्या **'' हा .... बोलून घ्या ना त्याच्याशी ... बोलण झाले होत सगळ''** मग मी म्हणालो **''पण सांगा ना मला काय''** त्यावर त्या म्हणाल्या **''नाय नाय झाल होत ना त्यांच्याशी ... परत तेच तेच काय बोलण्यात काय अर्थ.... तुम्ही सांगा.''** परत मी लोकसेविका आरती चंदनशिवे यांना म्हणालो **''काय म्हणजे ..... तुम्ही रिझनेबल करा ना...''** त्यावर त्या म्हणाल्या **''त्यांना सांगितले होते ना.... त्यांना साहेब .... परत परत नाय सांगणार''**, मी म्हणालो

कृपया मागे पहा....

"....त्यांनी मला दिड लाख सांगितले होते.... **थोड रिझनेबल करून दया... मी काय बोलणार मॅडम...**" त्यावर त्यांनी "**मी पण काय नाय बोलणार...**" असे सांगितले. तसेच चर्चेत मी त्यांना म्हणालो की, "**किती पन्नास हजार करणार...**" त्यावर त्या म्हणाल्या "**दोन आहेत तुमचे ते....**", मग मी म्हणालो "**दोनचे सांगतोय... पंचविस हजार एकाचे**" त्यावर लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी माझे मोबाईलकडे बघून "**...एक फोन बीन अं...**" असे अर्धवट वाक्य बोलल्या त्यावर मी म्हणालो "**नाय नाय फोन नाय, बंद आहे**" तेव्हा त्या म्हणाल्या "**कारण हल्ली कोणाशी बोलायच म्हणजे भिती वाटते बघा...**" त्यानंतर आमच्यात इतर विषयावर चर्चा झाली व बोलता बोलता परत मी त्यांना काहीतरी रिझनेबल करा असे सांगितले असता, त्यांनी त्यांच्या समोरील कॅलक्युलेटरवर १ आकडा टाईप केला. तेव्हा मी म्हणालो "**किती एक लाख... मॅडम बघा आता ... तुम्हाला काय ते माझा फिगर बराबर बोललाय मी... तुम्ही कॅलक्युलेटरवर फक्त एक रूपया लिहला**" त्यावर लोकसेविका आरती चंदनशिवे हसल्या व म्हणाल्या "**तो दया मला काय फरक नाय पडत... बाकी तुम्ही भेटून घ्या मग साहेबांकडे...**", परत मी त्यांना काहीतरी रिझनेबल करा असे म्हणालो असता, त्या म्हणाल्या "**साहेब आपल्याला रिलेशन मेन्टेन करायचेय...**" मग मी म्हणालो "**का पन्नास हजर दिले तर रिलेशन राहणार नाही... एक लाख दिले तर नाय राहणार... अस तर हाय नाय...**" त्यावर लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी "**बरोबर आहे**" असे उत्तर दिले. त्याबाबतचे आमचे संभाषण माझे शर्टच्या आत लावलेल्या व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झाले आहे. सदर पडताळणी कारवाई दरम्यान त्यांनी माझे काम करून देण्याकरीता मुदत मागून मला दिनांक २५/०६/२०१९ नंतर संपर्क करण्यास सांगितले.

दिनांक २०/०७/२०१९ रोजी लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी माझे मोबाईल क्रमांक ९३२०२०२१२१ वर त्यांचा मोबाईल क्रमांक ९९६७७०९८३५ वरून फोन करून दिनांक २२/०७/२०१९ रोजी त्यांचे कार्यालयात येण्यास सांगितले. म्हणून मी लगेच सदरबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात माहिती देण्याकरीता गेलो असता, यापुर्वीचे चौकशी अधिकारी पोनि ठेंगळे यांची इतरत्र बदली झाल्याने त्यांचे ऐवजी पोनि दिपक जाधव यांची नेमणूक केल्याचे मला समजले त्यामुळे मी सदरची माहिती पोनि दिपक जाधव यांना दिली. त्यानुसार दिनांक २२/०७/२०१९ रोजी पोनि दिपक जाधव, सपोआ विजयकर व पोलीस पथक दोन शासकीय पंचासह पुढील सापळा कारवाईकरीता सर्व साहित्य व तयारीनिशी माझे रूलर प्लास्टिक, युनिट नंबर २, चुनीलाल मेहता कंम्पाउंन्ड, हरीष अर्जुन पालव मार्ग, भायखळा, मुंबई ४०००२७ येथील कारखान्यात आले. तसेच लोकसेविका आरती चंदनशिवे या यापुर्वी दोनवेळा माझे कार्यालयात येवून गेल्या असून त्या आज देखिल येण्याची शक्यता असल्याचे मी पोलीस पथकास सांगितले. साधारण १२.३६ वा मी लोकसेविका आरती चंदनशिवे यांच्या कार्यालयात फोन केला असता, त्यांनी फोन उचलला नाही व लोकसेविकेकडून देखिल काही प्रतिसाद न मिळाल्याने कारवाई स्थगित करण्यात आली.

समक्ष

( संजीव फुलपगारे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

**श्री रमणिक हरधोर कारीआ, वय ५७ वर्षे यांचा दि. १५/१०/२०२० रोजीचा जबाब पुढे चालू...**

त्यानंतर लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी मला दिनांक २५/०७/२०१९ रोजी बोलाविल्याने त्याबाबत मी पोनि दिपक जाधव यांना माहिती दिली असता, दिनांक २५/०७/२०१९ रोजी पोनि दिपक जाधव, सपोआ विजयकर, पोलीस पथक व दोन शासकीय पंचासोबत सापळा कारवाईकरिता माझे कारखाण्यात आले व वरीलप्रमाणे कारवाई संदर्भातील इतर पुर्व तयारी करण्यात आली त्यानंतर साधारण १४.१८ वा. मी लोकसेविका आरती चंदनशिवे यांना त्यांचे वर नमुद मोबाईल क्रमांकावर माझे मोबाईलवरून फोन केला असता, त्यांनी फोन उचलला नाही. परंतु लगेच त्यांनी स्वत: मला त्यांचे मोबाईलवरून फोन केला व कामाविषयी चर्चा करून **"मी साईटवर जाणार आहे, तुम्ही किती वाजेपर्यंत ऑफीसमध्ये आहात, तुमचे असेल तर सांगते"** असे म्हणून फोन बंद केला. परंतु त्या दिवशी देखिल त्या न आल्याने कारवाई स्थगित करण्यात आली. तसेच दिनांक २६/०७/२०१९ रोजी देखिल लोकसेविका आरती चंदनशिवे यांचेकडून काही प्रतिसाद न आल्याने त्या दिवशी देखिल कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दिनांक २७/०७/२०१९ रोजी लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी मला एसएमएस. करून कामासंदर्भात त्यांना फोन करण्याबाबत सांगितल्याने वरीलप्रमाणे पोनि दिपक जाधव, पथक व पंच सापळा कारवाईच्या सर्व तयारीनिशी माझे कारखान्यात आले व लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी मला मेसेज केल्याप्रमाणे मी पोनि दिपक जाधव यांचे सांगण्यानुसार लोकसेविका आरती चंदनशिवे यांचे मोबाईलवर फोन केला परंतु त्यांनी माझा कॉल उचलला नाही. परंतु थोडयावेळाने त्यांनी स्वत: मला फोन केला व त्या कामानिम्मीत साईटवर जात असल्याचे सांगून पुढील आठवडयात भेटेन असे सांगितले, त्यामुळे त्यादिवशी देखिल कारवाई स्थगित करण्यात आली, परंतु लोकसेविका आरती चंदनशिवे यांनी दिनांक १४/०६/२०१९ रोजी माझेकडे कारखानाच्या परवाना नुतनीकरण करण्याकरीता कॅलक्युलेटरवर १ हा अंक टाईप करून एक लाख रूपये लाचेची मागणी केलेली आहे.

तरी माझे कारखान्याचा परवाना नुतनीकरण करण्याचे काम करून देण्याकरीता लोकसेविका आरती चंदनशिवे, सब इंजिनिअर, ई विभाग, बिल्डिंग व फॅक्टरी डिपार्टमेंन्ट, भायखळा, मुंबई यांनी माझेकडे दिनांक १४/०६/२०१९ रोजी १,००,०००/- रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वर नमुद जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मला मराठीतून वाचून, हिंदीतून समाजावून सांगितला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( संजीव फुलपगारे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... पडताळणी करुन दाखल

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

......

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... -

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... -

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद तारीख वेळ व ठिकाणी यातील आरोपी लोकसेविका श्रीमती आरती चंदनशिवे, ई-वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई यांनी फिर्यादी यांच्या कारखान्याचा परवाना नुतनीकरण करण्याकरीता स्वत:साठी रु.1,00,000/- रक्कमेची लाच मागणी करुन गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक संजीव फुलपगारे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ......

District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... संजीव कृ. फुलपगारे
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ......
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख......
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**